महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं-२०२५/तीन/ Ad-hoc शुल्क/५११ दिनांक:-०६/०६/२०२५

परिपत्रक (Web Circular)

प्रति,

१. अध्यक्ष/सचिव,
विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
कला परिसंस्थांचे ट्रस्ट/सोसायटी

२. प्राचार्य,
विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्था (मंडळाशी संलग्नित)

विषय:- विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्थामधील अभ्यासक्रमासाठी **Ad-hoc** शुल्काबाबत.

संदर्भ:- शुल्क निश्चिती समितीची दि. ३०.०५.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या अधिनियमात कलम ४७ मध्ये विनाअनुदानित खाजगी कला परिसंस्थामध्ये चालविण्यात येणाऱ्या पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याकरीता शुल्क निश्चिती समितीची तरतुद केली आहे. त्यानुसार शासनाने १३ मार्च, २०२४ च्या आदेशान्वये शुल्क निश्चिती समिती गठित केलेली आहे.

शुल्क निश्चिती समितीच्या दि. ३०.०५.२०२५ रोजीच्या चौथ्या बैठकीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये **प्रथम वर्ष/सत्र** प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता खालील प्रमाणे पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरीता तात्पूरत्या स्वरूपात Ad-hoc शुल्क निश्चित केलेले आहे.

| अभ्यासक्रम | बाब | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता Ad-hoc शुल्क प्रत्येक अभ्यासक्रमाकरीता (रु.) |
|---|---|---|
| १. मुलभूत (Foundation Certificate in Art and Design),<br>२. कला शिक्षक पदविका (Art Teacher's Diploma) | १.शैक्षणिक शुल्क | १७३००/-<br>(रु.८६५०/- प्रतिसत्र) |
| ३. रेखा व रंगकला पदविका, (Diploma in Drawing and Painting)<br>४. उपयोजित कला पदविका, (Diploma in Applied Art)<br>५. शिल्पकला व प्रतिमानबंध पदविका, (Diploma in Sculpture and Modeling)<br>६. कला व हस्तकला-अंतर्गत गृहसजावट पदविका, (Diploma in Art and Craft-Interior Decoration)<br>७. कला व हस्तकला-वस्त्रकाम, (Textile), पदविका -प्रिंटींग ॲन्ड डाईंग (Diploma in Art and Craft - Textile Design Weaving) | २.विकास शुल्क | १७३०/- |

| | | |
|---|---|---|
| ८. कला व हस्तकला-मातकाम (सिरॅमिक व पॉटरी) पदविका (Diploma in Art and Craft-Ceramics and Pottery)<br>९. कला व हस्तकला-धातूकाम (मेटल क्राफ्ट) पदविका (Diploma in Art and Craft-Metal Craft)<br>१०. कला शिक्षणशास्त्र पदविका (Diploma in Art Education)<br>११. आर्ट मास्टर प्रमाणपत्र (Art Master॰s Certificate) | | |
| | एकूण - | १९०३०/- |

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रथम वर्ष/सत्र प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता शुल्क निश्चिती समितीने वरील Ad-hoc शुल्क खालील अटींच्या अधीन राहून कला परिसंस्थांना लागू करण्यास मान्यता दिलेली आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची संलग्नता घेतलेल्या विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्थांनाच वरील Ad-hoc शुल्क लागू असेल.

२. सदर कला परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता विहीत कार्यपध्दतीनुसार शुल्क निश्चितीसाठी शुल्क निश्चिती समितीच्या (F.F.C.) पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने, आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या लेखा विषयक ऑडिट रिपोर्ट च्या अनुषगाने खर्चाची संपूर्ण माहिती भरुन शुल्क निश्चितीबाबतचा प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे.

३. कला परिसंस्थांनी सन २०२५-२०२६ च्या खर्चाबाबतची सर्व कागदपत्रे, रजिस्टर इत्यादीची माहिती शुल्क निश्चिती समितीला उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

४. शुल्क निश्चिती समितीकडून ठरवून दिलेल्या शिक्षण शुल्का व्यतीरिक्त विद्यार्थ्याकरीता इतर शुल्क आकारता येणार नाही.

सर्व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्थांना कळविण्यात येते की, शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेले Ad-hoc शुल्क रु.१९,०३०/- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष/सत्र प्रवेशित विद्यार्थ्यांना आकारण्यात यावे. याबाबतचे शुल्क निश्चिती समितीने अटीपूर्ततेबाबत दिलेले हमीपत्र संस्थेने स्टॅम्प पेपरवर भरुन नोटरी करुन सदस्य सचिव, शुल्क निश्चिती समिती, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ यांचे नावे प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी पाठवावे. ज्या संस्था हमीपत्र देणार नाहीत, त्या संस्थेतील विद्यार्थ्यांना Ad-hoc शुल्क आकारता येणार नाही, याची नोंद घ्यावी. सदर परिपत्रक मा.अध्यक्ष, शुल्क निश्चिती समिती यांच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत हमीपत्राचा नमुना जोडला आहे.

(विनोद दांडगे),
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी :-

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, शुल्क निश्चिती समिती, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई
४. मा.कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

(रु.१००/५०० च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले)

# हमीपत्र

मी (अध्यक्ष/सचिव यांचे नांव)-----------------,----------------- (ट्रस्ट/सोसायटीचे नांव) ट्रस्ट/सोसायटीचा, अध्यक्ष/सचिव असून, माझी -----------------(कला परिसंस्थाचे नाव व पत्ता)ही कला परिसंस्था आहे. आपल्या दि.-------------च्या परिपत्रकानुसार मी संस्थेतील अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधे प्रथम वर्ष/सत्र प्रवेशित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या शुल्क निश्चिती समितीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता निश्चित केलेले Ad-hoc शुल्क आकारणार आहे. शुल्क निश्चिती समितीने ठरवून दिलेल्या खालील अटी मला मान्य आहेत.

१. माझ्या कला परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची संलग्नता घेतलेली आहे.

२. मी शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता विहीत कार्यपध्दतीनुसार शुल्क निश्चितीसाठी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने, आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या लेखा विषयक ऑडिट रिपोर्ट च्या अनुषगाने खर्चाची संपूर्ण माहिती भरुन शुल्क निश्चितीबाबतचा प्रस्ताव सादर करणार आहे.

३. मी सन २०२५-२०२६ च्या खर्चाबाबतची सर्व कागदपत्रे, रजिस्टर इत्यादीची माहिती शुल्क निश्चिती समितीला उपलब्ध करून देणार आहे.

४. मी शुल्क निश्चिती समितीकडून ठरवून दिलेल्या शुल्का व्यतीरिक्त विद्यार्थ्याकरीता इतर शुल्क आकारणार नाही.

वरील सर्व अटींचे पालन करण्याबाबतची हमी मी देत आहे.

दिनांक :

ठिकाण :

ट्रस्टचा शिक्का

सही...

नांव...

ट्रस्टचे/सोसायटीचे नांव...